# मराठी ग्रामीण कादंबरीतील कृषी अर्थव्यवस्थेचे संदर्भ आणि आकलन

**प्रा.शुभम मनोहर सुरवाडे**
अर्थशास्त्र विभाग,
ज.जि.म.वि.प्र. सह समाजाचे
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,जळगाव – ४२५००१

**प्रा.उन्नती संजय चौधरी**
मराठी विभाग,
धनाजी नाना महाविद्यालय,फैजपूर – ४२५५०३

**प्रस्तावना :-**

भारतामध्ये पूर्वी पासून कृषी केंद्रित जीवन पद्धती अस्तित्वात आहे. शेती कसणारा शेतकरी आणि त्याला आवश्यक असणारे श्रमजीविक घटक यांची एक ग्राम संस्कृती निर्माण झालेली आहे. शेती व्यवसाय आणि कृषी अर्थव्यवस्था हे या संस्कृतीचे मूलाधार आहेत. त्याच्या केंद्रस्थानी शेतात रात्रदिवस राबणारा आणि अन्नधान्य पिकवणारा शेतकरी आहे. निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित असे अनेक संकटे पार करून पिढ्यानपिढ्या शेतीनिष्ठा राखून शेतकऱ्याने कृषी अर्थव्यवस्था केवळ टिकवूनच ठेवली नाही तर भारतीय अर्थकारणाला फार मोठे पाठबळ दिलेले आहे अशा शेतकरी जीवनाचे आकर्षण आणि त्याच्या विषयीचे चिंतन प्रतिभावंत लेखक, साहित्यिकांनी केलेले आहे. म्हणून मराठी कादंबरी वाङ्मयातून शेतकरी आणि शेतीव्यवसाय यांचे दर्शन घडते त्या आधारे कृषी अर्थव्यवस्थेचे संदर्भ दुय्यम स्रोत म्हणून त्यातून शोधता येतात.

**शेतकऱ्याचे प्रकार :-**

आजही भारतातील ७०% लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे मात्र सर्वांकडेच शेतजमीन आहे असे नाही. ज्यांच्या कडे शेती आहे तेही सारख्या प्रमाणात नाही. कारण सामाजिक व आर्थिक विषमता आणि वाढती लोकसंख्या यामुळे शेतजमिनीचा आकार आणि मालकी यात फरक दिसून येतो. त्याच्या आधारेच शेतकऱ्याचे पाच प्रकार पडलेले दिसून येतात. ते पुढील तक्त्यावरून स्पष्ट करता येतात.

**शेतकऱ्यांचे प्रकार**

| Sr. No. | Group | Sr. No. | Class (In ha.) |
|---|---|---|---|
| 1. | Marginal | 1<br>2 | Below 0.5ha<br>0.5 < 1.0 ha |
| 2. | Small | 3 | 1.0 < 2.0 ha |
| 3. | Semi - Medium | 4<br>5 | 2.0 < 3.0 ha<br>3.0 < 4.0 ha |
| 4. | Medium | 6<br>7<br>8 | 4.0 < 5.0 ha<br>5.0 < 7.5 ha<br>7.5 < 10.0 ha |
| 5. | Large | 9<br>10 | 10.0 < 20.0 ha<br>And above |

Source : Agriculture Census 2015 – 16

एक हेक्टर पेक्षा कमी जमीन असलेले सीमांत शेतकरी. १ ते २ हेक्टर भूधारण क्षेत्र असलेले अल्पभूधारक, ०२ ते ०४ हेक्टर जमीन धारण क्षेत्र असलेले अल्प-मध्यम शेतकरी. ०४ ते १० हेक्टर जमीन धारण क्षेत्र असलेले मध्यम शेतकरी आणि १० हेक्टरपेक्षा जास्त जमीन धारण क्षेत्र असलेले मोठे शेतकरी अशा प्रकारे शेतकऱ्यांची वर्गवारी पाहता अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. मध्यम व अल्पभूधारक शेतकरी हा नेहमीच समस्याग्रस्त आणि ताणतणावात जीवन जगत आलेला आहे. त्याच्या संबंधी भारतीय अर्थसंकल्पामध्ये जसा विकासाच्या दृष्टीने विचार केला गेला आहे. तसाच त्याच्या समस्यांचा विचार विचारवंत आणि प्रतिभावंत लेखकांनी देखील केलेला आहे. कारण भारतीय शेतीतील अनिश्चितता आणि धोके हे कायम राहिलेले आहेत.

**भारतीय शेती व्यवसायातील समस्या आणि धोके :-**

भारतीय शेती हि मौसमिक पावसावर अवलंबून असल्याने त्याचा शेती क्षेत्रावर कमी अधिक परिणाम झालेला

आहे. विशेषतः "देशाच्या अर्थव्यवस्थेतील इतर कोणत्याही क्षेत्रापेक्षा शेतीक्षेत्रात (म्हणजेच शेतीव्यवसायात) अधिक धोके असतात व जास्त अनिश्चितता असते. ह्याचे कारण म्हणजे इतर कोणत्याही क्षेत्रापेक्षा शेतीक्षेत्रात निसर्गाची भूमिका फार महत्वाची असते."[२] असे असले तरी निसर्गाला पर्याप्त अशी व्यवस्था अर्थात जलसिंचनाच्या पुरेशा सुविधा निर्माण करून कृषी अर्थव्यवस्थेला बळकटी देता आलेली नाही. म्हणून शेतकरी जीवनातील व शेती विषयक समस्या अजूनही दिसून येतात. यामध्ये शेतकऱ्यांच्या साधनसामग्री बाबत असलेली उपलब्धता त्याला विचारात टाकणारी असते. शेती केलीच तर हाती येणारा हंगाम आणि पिक उत्पादन झालेच तर धान्याच्या किंमती संबंधी शासकीय धोरणाची अनिश्चितता हे प्रश्नही त्याच्या समोर असतात. बऱ्याचदा सीमांत व लहान शेतकरी यांच्याकडे शेती करण्यासाठी आर्थिक तरतूदही नसते. चालू हंगामासाठी बी बियाणे, रासायनिक खाते, श्रमिकांसाठी मजुरी देणे यासाठी आवश्यक असणारा पैसा त्याच्याकडे नसतो. शिवाय त्याची बाजारात पत नसल्याने त्याला कोणी कर्जपुरवठाही करत नाही. त्याचा परिणाम शेती उत्पादकतेवर होतो.

**शेतीची उत्पादकता :-**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो म्हणून शेती क्षेत्राच्या विकासाशी अर्थव्यवस्थेचा विकास निगडीत असल्याचे बोलले जाते. मात्र शेती क्षेत्राच्या प्रगतीसाठी खुपसाऱ्या योजना कार्यान्वित करूनही शेती तोट्याची ठरलेली आहे. मोहन सराफ यांनी शेतीच्या कमी उत्पादकतेची कारणमीमांसा करताना म्हटले आहे कि "स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शेतीच्या उत्पादकतेत वाढ झाली असली तरी जगातील देशांशी तुलना करता आपल्या शेतीची उत्पादकता फारच कमी वाटते. त्यामुळे कमी उत्पादकतेस जबाबदार असलेली कारणे तपासणे आवश्यक ठरते"[३]

अतिरिक्त लोकसंख्या, भूधारणक्षेत्राचे मोठ्या प्रमाणात होणारे तुकडीकरण, उत्पादन पेरणांचा अभाव, कालबाह्य झालेली जुनी उत्पादन तंत्रे, जलसिंचनाचा अभाव, भांडवलाची कमतरता, शेती मालाच्या बिनकिफायतशीर किंमती आणि प्रतिकूल वातावरण अशी अनेक कारणे आजही सांगितली जातात. तरीही शेती उत्पादकतेच्या बाबतीत आश्वासक वातावरण निर्माण झालेले दिसते. शेती करण्याच्या विविध पद्धती वापरत असल्याने त्याचा एक फायदा कृषी अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी झालेला आहे.

**शेतीकरणाच्या पद्धती :-**

पिक उत्पादन घेणाऱ्या प्रकारावरूनही शेती करण्याच्या निरनिराळ्या पद्धती प्रचलित झालेल्या आहेत. मनुष्यबळ, प्राणी, आदाने, यंत्रसामग्री, पाणीपुरवठा यांच्या सहाय्याने जमीन कसून पिक उत्पादन घेतले जाते. त्यावरून शेतीकरणाचे वेगवेगळे प्रकार पडलेले आहेत. त्यामध्ये बहुविध पिकांची शेती, दुर्जल शेती, जिराईत शेती, फुलशेती, मत्सशेती, सेंद्रिय शेती, रासायनिक शेती, रोपवाटिका शेती, हरितगृह शेती अशा प्रकराची शेती आज केली जात आहे परंतू यासाठी जमीन, पाणी, वीज, भांडवल, बी बियाणे, खते, यंत्रसामग्री, मानवीश्रम, साठवणूक, वाहतूक हे आवश्यक घटक महत्वाचे मानले जातात.

**शेतीसाठी आवश्यक घटक :-**

**१.पाणी** :—

पाणी हा शेतीचा पाया मानला जातो परंतु बऱ्याच भागात अवर्षण प्रवणतेमुळे शेतकऱ्यांना दुष्काळास सामोरे जावे लागते. त्यासाठी पंचवार्षिक योजनांमध्ये जलसिंचन व्यवस्थेवर भर देवून मोठे, मध्यम व लहान सिंचन प्रकल्प निर्माण करण्यात आले. त्याआधारे पाण्याखालील शेतीक्षेत्र वाढत गेले. वर्षातून दोनदा पिके घेता आल्याने शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढत गेली परंतु सोबत शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळालेला दिसत नाही.

**२.वीज** :—

शेतीच्या पाणी वापरासाठी पाणी खेचणाऱ्या पंपासाठी प्रामुख्याने विजेचा वापर केला जातो. लहान शेतकरी व मोठे शेतकरी यांच्यात विजेचा वापर करण्याच्या पद्धतीत फरक दिसून येतो मात्र भारतात शेतीसाठी वीज वापरण्याचे प्रमाण हे वाढलेले दिसून येते. जसे "आर्थिक सर्वेक्षणानुसार (१९८९ — ९०) भारतातील एकूण वीज वापरापैकी सन १९७० — ७१ मध्ये शेती क्षेत्रात सुमारे १०.२ % इतकी वीज वापरली जाते असे, तर सन १९८७ — ८८ साली देशातील एकूण वीज वापरापैकी सुमारे २३.८% इतकी वीज शेती क्षेत्रात वापरली जाते."[४]

**३.यंत्रसामग्री** :-

शेतीच्या शाश्वत विकासासाठी जूनी अवजारे वापरण्यापेक्षा अलीकडे नवीन तंत्रज्ञान आणि यंत्रसामग्री

यांचा वापर करण्यावर भर देण्यात आला. त्यासाठी भारताच्या कृषी मंत्रालयाने कृषी यांत्रिकीकरण व तंत्रज्ञान विभागामार्फत शेतकरी कल्याणासाठी २०२० – २१ या वर्षीच्या अर्थसंकल्पात कृषी यांत्रिकीकरणावरील उपमिशन साठी १०३३ कोटीची तरदूत केली होती विशेषतः "कृषी हे देशाचे सामाजिक व आर्थिक दृष्टीने प्राथमिक क्षेत्र आहे व ते राहील. शेती क्षेत्राच्या स्थैर्यासाठी प्राथमिकता ठरविणे व त्यासाठी सकारात्मक पावले उचलणे हि काळाची गरज आहे. भविष्यकाळात शेती जिवंत ठेवण्यासाठी यांत्रिकीकरण हाच पर्याय आहे व त्यासाठी प्राथमिकतेने उपाय योजना करण्याची गरज आहे."[५] अशा प्रकारे शेतकऱ्यांचे प्रकार, भारतीय शेती व्यवसायातील समस्या आणि धोके, शेतीची उत्पादकता, शेती करण्याच्या पद्धती, शेतीसाठी आवश्यक असणारे घटक ह्या कृषी अर्थव्यवस्थेतील विचारात घेतल्या जाणाऱ्या गोष्टी मराठी कादंबरीत वाड्मयातून देखील आढळून येतात. म्हणून कृषी अर्थव्यवस्था आणि मराठी कादंबरी यांचा परस्पर संबंध स्पष्ट करता येतो.

**मराठी ग्रामीण कादंबरीतील कृषी अर्थव्यवस्थेला संदर्भ :-**

समाजात राजकीय आणि आर्थिक घडामोडी घडत असतात साहित्यिक हा समाजाचा घटक असल्याने त्या घडामोडीकडे तो चिंतनशील दृष्टीने पाहतो आणि साहित्याच्या माध्यमातून त्याची मांडणी करतो. म्हणून साहित्य आणि समाज यांचा परस्पर सबंध प्रस्थापित होतो. मोहन पाटील यांच्या मते " पात्र प्रसंगांच्या माध्यमातून गूढ, अनाकलनीय, गुंतागुंतीच्या सर्वागीण मानवी जीवनाचे समर्थदर्शन कादंबरीतून घडत असते. तसेच एका ठोस वाड्न्मय प्रकाराच्या निमित्ताने बदलत्या ग्रामीण सामाजिक, आर्थिक स्थिती गतीचे काही एक आकलन मांडता येते."[६] म्हणजेच ग्रामीण कादंबरीतून आर्थिक दृष्ट्या शेतीव्यवसाय आणि शेतकऱ्यांचे जीवनमान यांचे संदर्भ अधोरेखित झालेले दिसतात.

- **हाल्या हाल्या दुध दे**

या कादंबरीत बाबाराव मुसळे यांनी ज्ञानबा नावाच्या शेतकऱ्याची बिकट आर्थिक स्थिती चित्रित केली आहे. ज्ञानबा सावकाराकडे जमीन गहाण ठेवून आणि कापूस व बैल विकून मुलाचे लग्न करतो. शेतीत कपाशीचे सुधारित बियाणे वापरून उत्पन्न घ्यावे आणि सावकाराच्या ताब्यातील जमीन सोडवून घ्यावी असा तो विचार करतो परंतु महागड्या बियाण्यासाठी त्याच्याजवळ पैसे नसतात. सोसायटीकडून कर्ज काढून रासायनिक खाते आणि किटकनाशके घेण्यासाठी पाचशे रुपये आधीचे कर्ज भरतो मात्र कारकूनाकडून त्याची फसवणूक होते. सावकार आणि त्याचा मुलगा ज्ञानबाला त्रास देतो. ज्ञानबाने लागवड केलेल्या कापसाच्या झाडांची चांगली वाढ होते. परंतू खोट्या बियाण्यामुळे कपाशीला फुलावू बोंडया लागत नाही. शेवटी कॅन्सरच्या आजाराने ज्ञानबाचा मृतू होतो. अशा आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकरी जीवनाचे विश्लेषण प्रा.सुभाष ज्ञानबा गव्हाणे यांनी केले आहे कि, "संकरीत बी – बियाण्यांनी घराच्या बियाण्यांची जागा घेतली. पिकांवर फवारण्याची वाढ झाली. त्यामुळे उत्पादन वाढले मात्र शेतकरी जिथला तिथेच राहिला, कारण उत्पादन खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. १९९० पर्यंत मोठे कास्तकार कसे तरी तग धरून होते. मात्र आधुनिकीकारण स्वीकारल्यानंतर १५-२० वर्षात छोट्या शेतकऱ्यांना शेतीचा वाढलेला अवाढव्य खर्च परवडेनासा झाला."[७]

- **चारापाणी**

या कादंबरीमधील रा.रं.बोराडे यांनी १९८५ – ८६ च्या दुष्काळाचे चित्रण केले आहे. दुष्काळामुळे कृषीनिष्ठ आर्थिक जीवन विस्कळीत होते. लोकांच्या अन्नधान्याची, शेतकऱ्यांच्या गुराढोरांसाठी लागणाऱ्या चारापाण्याची टंचाई निर्माण होते. ज्यांच्याकडे पैसे असतात ते चारा विकत घेतात. कारण बैलांना जगवणे त्यांना आवश्यक वाटते. उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या शेतीसाठी बैलांची काळजी घेणे आवश्यक असते. काही शेतकऱ्यांना बैलांच्या गळ्यात दावण बांधून सोडून द्यावे लागते. तसे केले नाही तर त्यांना शेती करणे शक्य होणार नाही म्हणून बैल सोडून देणाऱ्या बाळबाला एकनाथ गायकवाड म्हणतो को, "बाळबा, कायबी कर, कसबी कर, पर दावण मोडायचं करू नगस. एकदा शेतकऱ्याची दावण मोडली की तो शेतकरी कायमचा मोडीत निघतो बग. बहात्तरच्या दुष्काळात ज्येंच्या दावणी मोडल्या त्येंच्या दावणी अजून भरल्या न्हाईत."[८] अर्थातच शेतीव्यवसायात पाणी आणि दुष्काळ या समस्या कायम भेडसावत आलेल्या आहेत. भारतासारख्या शेती प्रदान देशाला दुष्काळावर मात करता आलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न अनोवृत्तरीत राहिलेले आहेत.

- **पाणगिरा**

या कादंबरीत विश्वास पाटील यांनी भीषण पाणी टंचाईमुळे शेतकरी पिक पद्धतीत कसे बदल करतात याचे चित्रण केले आहे. मोठ्या प्रमाणात ऊस लागवड करणाऱ्या पाणगिरा गावाला सुबत्ता प्राप्त होते. ऊसासाठी शेतात अतिरिक्त पाणी सोडले जाते. शर्मा नावाचा कृषी संशोधक पाण्याचा उपसा अधिक होत असल्याच गावकऱ्यांना लक्षात आणून देतो आणि सावधही करतो परंतू गावकरी त्याच्या म्हणण्याकडे लक्ष देत नाही. अतिरिक्त उकास्यामुळे विहिरीच्या पाण्याची पातळी कमी होते. म्हणून ऊस लागवडीचे क्षेत्र बिघडते. मजुरांवर बेकारीची वेळ येते. भावाभावात विहिरीच्या पाण्यावरून भांडणे होतात. एक भाऊ दुसऱ्या भावाचा खूनही करतो. ऊस पिका बरोबर पाणी टंचाईमुळे गरजेसाठी वापरले जाणारे पाणी मिळत नाही. शेतकरी कमी पाण्यावर येणारे पिक लागवड करतात. त्यातच सततच्या दुष्काळामुळे अन्नधान्याची टंचाई निर्माण होते. ऊसापेक्षा कांद्याची लागवड केली जाते. परंतू व्यापाऱ्याकडून योग्यभाव मिळत नाही. शेतकरी आणि व्यापारी यांच्यात संघर्ष निर्माण होतो. पिक पद्धतीत बदल करूनही शेतकऱ्यांना काही फायदा होत नाही. त्यांचा कर्जबाजारीपणा वाढत जातो. सावकाराकडून त्यांचे शोषण होते. केवळ पाणी टंचाईमुळे त्यांच्या वाट्याला ह्या समस्या निर्माण झालेल्या दिसतात. त्याला स्वतः शेतकरी जबाबदार असतात कारण “माजोरी होऊ नका, पाणी जपून वापरा नाहीतर काही वर्षात गावाच वाळवंट होईल. पाणी टिकणार नाही.” [९] असा इशारा देवूनही शेतकऱ्यांनी ऐकलेले नसते. त्याचे परिणाम त्यांच्या वाट्याला कसे येतात हे लेखकाने वस्तुनिष्ठपणे कादंबरीतून साकार केलेले आहे.

- **आभाळ**

आभाळ या कादंबरीत तानाजीराव पाटील यांनी मोठे शेतकरी आणि अल्पभूधारक शेतकरी यांच्या शेती करण्याच्या पद्धती आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न याची मांडणी केलेली आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे शेती विषयक पुरेसे आदाने नसतात. स्वतःच्या शेती बरोबर ते मोठ्या शेतकऱ्याकडे राबतात आणि त्यांचाच बैल व अवजारे घेवून स्वतःच्या जमिनी पेरतात. त्यांच्या शेतीमालास व्यापारी वर्गातून योग्यभाव मिळत नाही. त्यांची लूट केली जाते अशा शेतकऱ्यांचे श्रम आणि शेती उत्पादन खर्च यात ताळमेळ बसत नाही म्हणून त्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते.

मोठ्या शेतकऱ्यांकडे विहिरीवरील दोनदोन तीनतीन मोटारपंप बसवलेले असतात. त्यांना शेती सिंचन करणे सोपे जाते. काही शेतकऱ्यांकडे ट्रक्टर, मळणी यंत्र हि साधने असतात. ते ऊस लागवड करतात. अल्पभूधारक शेतकऱ्यांना मात्र ते शक्य होत नाही. ते नेहमीच संकटात असतात. मुलांना चांगले शिक्षणही देवू शकत नाही. या कादंबरीतील राजा नावाचा मुलगा १० वि नापास होतो त्यावेळी तो त्याच्या बापाला म्हणतो कि, “मला मग पैसे द्याय नकोत, का साळला घाटलासा. येकालाच काय मिळणा तर एवडी पोरचं कशाला ती” [१०] अशा प्रकारे अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या गरिबीमुळे कुटुंबात होणारे ताणतणाव यातून स्पष्ट होतात. याच बरोबर मराठी कादंबरीतून कृषीनिष्ठ जीवनाचे चित्रण करण्याची परंपरा प्रत्येक लेखकाच्या पिढीमध्ये राहिलेले आहे. त्याविषयीच्या चित्रणाचा कालपट पहिला तर कृषी अर्थव्यवस्थेत आणि शेतीव्यवसायात खूप बदल झालेले दिसतात. यासंदर्भात सुभाष गव्हाणे निष्कर्ष नोंदवतात कि, “जागतिकीकरणाचा आणखी एक भीषण परिणाम म्हणजे हजारो वर्षांपासून पिढ्यानपिढ्या शेतीवर उपजीविका करणारा व इतरांनाही जगविणारा, तगविणारा शेतकरी या आधुनिक काळात त्याच्या विरोधी निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे हतबल झाला, कर्जबाजारी झाला त्यातून महाराष्ट्रात शेतकरी वर्गाने मोठ्या प्रमाणात आत्महत्या केल्या “बाळोमास” , “साखळपेरा” , “पांढर” या सोबतच इतरही काही ग्रामीण कादंबऱ्यांनी शेतकरी जीवनाची हि शोकांतिका व्यक्त होते.” [११] बदलत्या काळाबरोबर शेतीव्यवसायात बदल घडून आले परंतू बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विशेष आर्थिक क्षेत्र म्हणून शेतकऱ्यांचे शेती क्षेत्र बळकावले. शेतकरी देशोधडीला लागले आणि शेती क्षेत्र आर्थिक विकासापासून दूर राहिले. तसेच शेतकऱ्यांना पतपुरवठ्याच्या सुविधा फारश्या उपलब्ध झाल्या नाहीत. त्यांना सावकारी पाशात अडकून पडावे लागले. शेतीत पिकलच तर व्यापारी वर्गाकडून त्यांची लूट झाली. शेतकरी कुटुंबातील नवी पिढी शेतीपासून दुरावत गेली. म्हणजेच शेती हा व्यवसाय याटपाट्यांचा झाल्यामुळे कृषी अर्थव्यवस्था सुदृढ बनू शकलेली नाही अशा या कादंबऱ्याच्या आशेय सूत्रातून स्पष्ट होते.

**निष्कर्ष :**

- भारतातील वाढती लोकसंख्या तसेच सामाजिक, आर्थिक विषमता यामुळे शेतकऱ्यांचे सीमांत शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी, अल्प-मध्यम शेतकरी, मध्यम शेतकरी आणि मोठे शेतकरी असे पाच प्रकार पडले आहेत.
- भारतीय शेती निसर्गावर अवलंबून असल्याने शेतीत अनिश्चितता आणि धोके मोठ्या प्रमाणावर आहेत त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांना शेती विषयक अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.
- स्वातंत्र्यानंतर भारतीय शेती उत्पादकतेत मोठ्या प्रमाणात वाढ घडून आली भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादन शेती क्षेत्रात वाटा मोठ्या प्रमाणात होता. परंतू नंतर पारंपारिक शेती पद्धती, तुकडीकरण, वाढती लोकसंख्या, आदानांचा अभाव, अपुरे भांडवल यामुळे उत्पादकतेत घट झालेली दिसते.
- भारतात उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्री व हवामानानुसार बागाईत शेती, जिराईत शेती, बहुविध शेती, अशा अनेक शेती प्रकारची शेती केली जाते.
- मराठी कादंबरीतून मोठे सदन अल्पभूधारक शेतकरी यांच्या आर्थिक जीवनाचे दर्शन घडते.
- मराठी कादंबरीकरांनी शेतीविषयक समस्यांचे चित्रण त्यांच्या कादंबरीतून केलेले आहे.
- आवर्षण, पाणी, टंचाई, शेतमालाच्या भावाचा प्रश्न, शेती भांडवलाचा अभाव या कारणांमुळे शेती तोट्यात जात असलेली सूचकता कादंबरीकरांनी त्यांच्या लेखनातून सांगितली आहे.

**संदर्भ :-**

१.Agriculture Census 2015 – 16
२. डॉ.स.श्री.मु.देसाई, सौ.डॉ.निर्मल भालेराव : 'कृषी अर्थशास्त्र आणि भारतातील शेतीव्यवसाय', निराली प्रकाशन, पुणे, पृ. ३२
३. मोहन सराफ आचार्य (१९९१): 'ग्रामीण अर्थव्यवस्था व सहकार', विद्या प्रकाशन, नागपूर, पृ. १८
४. डॉ.देसाई स.श्री.मु.,सौ.डॉ.भालेराव निर्मल (१९९१): 'कृषी अर्थशास्त्र आणि भारतातील शेती व्यवसाय, निराली प्रकाशन, पुणे, पृ. ८४
५. vikaspedia : 'शेतीचे यांत्रिकीकरण : सद्यस्थिती व भविष्यातील दिशा' (२२ मे २०२२)
६. पाटील मोहन (२०१३): 'ग्रामीण साहित्य आणि संस्कृती',स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृ. ११०
७. प्रा.गव्हाणे सुभाष ज्ञानबा : 'बदलती कृषी अर्थव्यवस्था चित्रित करणाऱ्या कादंबऱ्या : एक अभ्यास (१९६० ते आसतागायत), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आचार्य (Ph.D.) पदवीसाठी सादर केलेला प्रबंध, मे २०१७ पृ.२०४
८. बोराडे रा.रं.: 'चारापाणी', मेहता पब्लिकेशन हाउस, पुणे, दुसरी आवृत्ती १९९८ पृ.१४
९. पाटील विश्वास : ' पाणगिरा' , राजहंस प्रकाशन, पुणे प्र.आ. १९९० पृ.१७
१०. पाटील तानाजीराव : 'आभाळ', डायमंड पब्लिकेशन, पुणे १९९२ पृ. ९५
११. प्रा.गव्हाणे सुभाष ज्ञानबा: ऊणी पृ. ४५२